# दि.२७/०२/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक २७.०२.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा. सभाध्यक्ष तथा उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

१. मा. श्री. बाळासाहेब मांगुळकर, उपाध्यक्ष जिल्हा परिषद यवतमाळ
२. मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे, सभापती शिक्षण व आरोग्य जिल्हा परिषद यवतमाळ
३. मा. सौ. लताताई खांदवे, सभापती समाजकल्याण जिल्हा परिषद यवतमाळ
४. मा. सौ. विमलताई चव्हाण सभापती महीला व बाल कल्याण जिल्हा परिषद यवतमाळ
५. सन्मा. श्री. मनमोहनसिंग चव्हाण सदस्य जि.प. यवतमाळ
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
७. मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
८. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)जिल्हा परिषद यवतमाळ
९. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद यवतमाळ
१०. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

**<u>इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी</u>**

१. श्री. ए.एम. आडे उपकार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
२. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
३. श्री. ए. एस. बोबडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग राळेगाव
४. श्री. ए.टी. पदमावार उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग पांढरकवडा
५. श्री. के.एम. मानकर उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग यवतमाळ
६. श्री. पी. एस. जयस्वाल उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग वणी
७. श्री. एन.बी. काळबांडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग पुसद
८. श्री. द.गा. गंगासागर शा.अ. जि.प. पाणी पुरवठा उपविभाग पुसद
९. श्री. विजय गुजलवार का.अ. (प्र.) सिंचन विभाग जि.प. यवतमाळ
१०. श्री. डी.बी. राठोड R.F.O. वनविभाग पांढरकवडा
११. श्री. विश्वास वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक भ.सं.वि.यं. यवतमाळ
१२. श्री. नितिन शहाडे क.अभि. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१३. श्री. एम.एम. जोशी प्रतिनिधी क.अ. पाटबंधारे विभाग यवतमाळ
१४. श्री. अ.ना. निसाळ उपकार्यकारी अभियंता सिंचन विभाग जि.प. यवतमाळ
१५ .श्री. एस.एन. निलावार मध्यम प्रकल्प विभाग यवतमाळ

१६.श्री. एच.एम. कठारे क.भुवै. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१६. ए.डब्लु. जोशी सहा. अभियंता MSEDCL विभाग यवतमाळ
१७.श्री. आर. बी. कोवे स्विय सहाय्यक सभापती म.व बा. जि.प. यवतमाळ
१८. श्री. अरुण नदार्थ स्विय सहा. अपाध्यक्ष जि.प. यवतमाळ
१९. श्री. प्रशांत नगराळे स.ले.अ. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
२०. श्री. जे. आर. राठोड कृ विकास अधिकारी
२१. श्री. वंदना ढवळे स्वच्छ भारत मिशन जि.प. यवतमाळ
२२. श्री. पि.के. भोंग स्विय सहाय्यक मा. अध्यक्ष जि.प. यवतमाळ
१९. श्री. भा.ब. पोटे तंत्र अधिकारी जि.प.यवतमाळ कृ.अ.
२०. श्री. पी.पी. राऊत स्विय. सहाय्यक
२१. कु. वंदना ढवळे स्वच्छ भारत मिशन
२२. श्री. भा. ब. पोटे तत्र अधिकारी जि. अ. कृ.अधिकारी
२३. श्री. पी. के. भोंग स्विाय सहाय्यक अध्यक्षा जि.प. यवतमाळ

*******

सर्व प्रथम अति. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांचे प्रतिनिधीनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.सभाध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरवात केली.

**विषय क्रमांक ०१ :- दिनांक ३०/०१/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्रमांक ०१ :- दिनांक ३०/०१/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक ०२ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयांचा आढावा घेतांना मा. सभापती शिक्षण व आरोग्य यांनी मागील सभेस विद्युत पुरवठा बाबत माहिती देण्यात आलेली होती, मौजा सिंगलदिप, खंडणी, मेंढणी हे Infra -०२ मध्ये असल्यामुळे सदर कामाचा कंत्राट पॅसेज फर्म ला कामे देण्यात आली असुन , सदर कामे दिड महिण्याच्या कालावधी मध्ये होईल असे सांगण्यात आले. परंतु अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच याला आणखी कीती दिवस लागणार आहेत अशी विचारणा केली. यावर म.रा.वि.म प्रतिनिधीने मटेरीयल टेस्टींगचे काम सुरु आहे. एका महीण्यात काम सुरु होईल असे सांगीतले.

**विषय क्रमांक ०३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने सभेत सादर केला.

मा.अध्यक्ष यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा घेतांना मारेगाव येथील योजनेचे कामा बाबत माहीती विचारली असता का.अ. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने सदर काम प्रगतीपथावर आहे, ७० % काम पुर्ण झालेले आहे, फक्त पंप हाऊसचे काम शिल्लक आहे ३० % काम बाकी आहे, व जुन २०१५ पर्यंत काम पुर्ण होईल असे सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी कंत्राटदार काम व्यवस्थीत करीत नसेल व विहीत मुदतीत काम पुर्ण झाले नाही तर प्रतिदिन रु. ५००/- दंड आकारण्यात यावा अश्या सुचना दिल्या.

त्यानंतर मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे सभापती शिक्षण व आरोग्य यांनी मौ. बिहाडी पोड येथील पाणी पुरवठा योजने बाबत कार्य कार्यवाही करण्यात आली अशी विचारणी केली तसेच निधी बाबत अडचण असल्यास त्याचे निधी मधुन रु. दिड लक्ष एवढा निधी घेऊन काम पुर्ण करण्यात यावा असे सांगीतले. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सदर बोअर ला पाणी भरपुर आहे व मा. सभापती महोदय यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे त्याचे निधी मधुन पैसा खर्च करुन पुढील कार्यवाही त्वरीत करण्यात यावी व उपविभाग वणी हयांनी अंदाजपत्रकाची तांत्रीक मंजुरी करुन द्यावे अश्या सुचना दिल्या.

**विषय क्रमांक ०४ :- स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण ) अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीचे संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे २२६८५ एवढे एकूण उदिष्ट आहे. त्यापैकी APL चे १४१७४ व BPL चे ८५११ एवढे उदिष्ट आहे. माहे फेब्रुवारी २०१५ अखेर पर्यंत APL चे ६१६८ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे २८९५ असे एकूण ९०६३ एवढे व्यैक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण ४२ % काम पुर्ण झाले असल्याची माहिती दिली.

त्यानंतर सन्मा. श्री. मनमोहनसिंग चव्हाण जि.प. सदस्य यांनी मौ. बोटोणी येथील ग्राम सेवकाचे माध्यमातुन जी शौचालयाची कामे सुरु आहेत. ती कामे अर्धवट बंद करण्यात आली आहे. शौचखड्डे करुन तसेच पडलेले असल्यामुळे ग्रामस्थ त्यात पडुन दुखापत होत आहे. त्यामुळे ग्रामस्थांची ओरड होत आहे. आणी ही परिस्थीती संपुर्ण जिल्हयामध्ये असल्याचे सांगीतले.

**विषय क्रमांक ०५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

१. प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरींची संख्या - ८५२९
२. सुरु केलेल्या विहीरींची संख्या - ५४९७
३. पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या - १७९८
४. सद्यस्थितीत सुरु विहीरींची संख्या - ३६९९
५. विहीरींवरील झालेला एकूण खर्च - ४६.६२
६. धडक सिंचन विहीरीची संख्या - ३८१०

**विषय क्रमांक ०६ :- ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

**सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखडयामधील उदिष्ठीत ९५ गांवे व बिगर उदिष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा**

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ ( Target) | | २०१३-१४ ( Non-Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरु केलेली कामे | मंजुर प्राकलन | सुरु केलेली कामे | |
| **दारव्हा** | दारव्हा | १ | १ | ६ | ६ | ३ |
| | नेर | २ | २ | ९ | ८ | ७ |
| **एकूण** | | **३** | **३** | **१५** | **१४** | **१०** |
| **पांढरकवढा** | पांढरकवढा | १ | १ | ३ | ३ | १ |
| | घाटंजी | ६ | ६ | ३ | २ | १ |
| **एकूण** | | **७** | **७** | **६** | **५** | **२** |
| **यवतमाळ** | यवतमाळ | ४ | ४ | १४ | १४ | १२ |
| | आर्णी | १३ | १३ | ३ | ३ | १ |
| | बाभुळगाव | १ | १ | ९ | ८ | २ |
| **एकूण** | | **१८** | **१८** | **२६** | **२५** | **१५** |
| **राळेगाव** | राळेगाव | २ | २ | ५ | ५ | ० |
| | कळंब | २ | २ | ११ | १० | ६ |
| **एकूण** | | **४** | **४** | **१६** | **१५** | **६** |
| **वणी** | वणी | १ | १ | ४ | ४ | ० |
| | मारेगाव | ५ | ५ | ५ | ४ | ० |
| | झरी | ४ | ४ | २ | २ | १ |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | १ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ४ |
| | उमरखेड | ० | ० | १ | १ | १ |
| | महागाव | ० | ० | २ | २ | २ |
| **एकूण** | | **४** | **४** | **८** | **८** | **८** |
| | | | | | | |
| **एकूण** | | **१०** | **१०** | **११** | **१०** | **१** |
| **जिल्हयाचे एकूण** | | **४६** | **४६** | **८२** | **७७** | **४२** |

त्यानंतर मा. सभध्यक्ष यांनी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत रखडलेल्या ११ योजनां बाबत माहीती विचारली. यावर कार्यकारी अभियंता पा.पु. यांनी गटविकास अधिकारी यांना कार्यवाही साठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांचे स्वाक्षरीने पत्र देण्यात आले आहे असे सांगीतले.

त्यानंतर मा. सभाध्यक्ष यांनी २०१४-१५ करीता पाणी टंचाई निवारनार्थ करवयाचे उपाय योजनां बाबत माहीती विचारली यावर का.अ. पा.पु. यांनी विंधन विहीरी कार्यक्रमा बाबत १८६ गावां मध्ये एकूण १९० विंधन विहीरीं करावयाच्या आहेत. ७३ गावांचे सर्वेक्षण करण्यात आले असुन ४० योग्य व ३३ अयोग्य आहेत. उर्वरीत गावांचे सर्वेक्षण सुरु आहे. १८ प्रस्ताव प्राप्त झालेले आहे त्यापैकी १५ प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यते करीता सादर करण्यात आले आहे. त्या पैकी ९ प्रस्तावांना आजपावेतो मंजुरात प्राप्त झालेली आहे. तात्पुरती पुरक नळ योजना दुरुस्तीचे १० प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाले असुन त्याचे तपासणी करण्याची कार्यवाही सुरुआहे. नळयोजना विशेष दुरुस्तीचे ८७ प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झालेले असुन त्यांची तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. ३३ प्रस्ताव मंजुरी करीता मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करण्यात आलेली आहे. त्यापैकी ९ प्रस्ताव म.जी.प्रा. चे आहेत, अशी माहीती सादर केली.

त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरिष्ठ भुवैज्ञानिक भु.सं.वि.यं. यांना सर्वेक्षणा बाबत विचारणा केली यावर वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी ५ तालुक्यांचे सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. कार्यकारी अभियंता यांचे कडे सर्वेक्षणा करीता वाहन उपलब्ध नसल्यामुळे सर्वेक्षण पुर्ण होऊ शकले नाही. अन्यथा १०० % सर्वेक्षण पुर्ण झाले असते असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी केवळ ५० % सर्वेक्षण पुर्ण झालेले आहे व उर्वरीत कधी त्वरीत पुर्ण करा असे सांगीतले.

त्यानंतर सन्मा. श्री. मनमोहनसिंग चव्हाण जि.प. सदस्य यांनी दारव्हा मधील पाणी टंचाई बाबत श्री. ए. व्ही. लोखंडे उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग दारव्हा यांनी पाणी पुरवठा योजने बाबत उत्कृष्ठ काम केले आहे, त्याबाबत त्यांचे सभागृहात अभिनंदन केले.

त्यानंतर वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी शाश्वतत : कार्यक्रमांतर्गत मौ. माजर्डा येथील बंधारा बांधणे बाबत काम योग्य झालेले नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी जलशिवार योजने अंतर्गत प्रत्येकाने एक गाव घेणे आवश्यक आहे. हया बाबत आजच पत्र काढा असे निर्देश दिले.

त्यानंतर मा. सभाध्यक्ष यांनी टेंभुर्णी व जाभळी येथील शाश्वततः कार्यक्रमांतर्गत कामे अद्यापही सुरु का करण्यात आले नाही अशी विचारणा केली यावर वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी समितीने पैसे परत केले आहे व समिती काम करण्यास तयार नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर मा. सभापती शिक्षण व आरोग्य जि.प. यवतमाळ यांनी मौ. सगणापुर व मौ. वडगाव येथील पिण्याचे पाणी दुषीत आहे. सदर गावामध्ये भिषण पाणी टंचाई असल्यामुळे लोकांना दुषित आणी फ्लोराईड युक्त पाणी प्याव लागत आहे. परंतु हया बाबत अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे सांगीतले, तसेच उपअभियंता पणी पुरवठा उपविभाग वणी हयांनी पाहणी करुन अहवाल द्यावा असे सांगीतले.

**विषय क्र. ७ :- धडक सिंचन विहीर योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर कार्यकारी अभियंता सिंचन विभाग यांचे प्रतिनिधीने धडक सिंचन विहीर योजने अंतर्गत कामाचा आढावा सादर केला.

कार्यकारी अभियंता सिंचन विभाग याचे प्रतिनिधीने पाझर तलावा करीता १० लक्ष ची मागणी करण्यामत आलेली आहे परंतु अद्याप निधी अप्राप्त असल्याचे सांगीतले. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी पुढील वर्षा करीता कीती तरतुद करण्यात आलेली आहे अशी विचारणा केली असता उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ यांनी निधी बाबत माहती पाहुन सादर करतो असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी धडक सिंचन विहीरी करीता प्रत्येक पं.स. ला एक कोटी ऐवढा निधी देण्यात आलेला आहे. त्यामुळे धडक सिंचन विहिरीची कामे ३० जुन पर्यंत पुर्ण होतील अशा पध्दतीने काम करुन घ्यावे असे सांगीतले.

## मा.अध्यक्ष जि. यवतमाळ यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

**विषय क्र. ८ :- मौजे पार्डी नकटी ता. कळंब येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मंजुरी मीळणे बाबत.**

१. मौजे पार्डी नकटी ता. कळंब जि. यवतमाळ येथील कायम स्वरुपी नळ पाणी पुरवठा योजनेची राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या लेखा शिर्षाअंतर्गत मुळ प्राकलीत किंमत रु. १५,३०,२००/- मंजुर करण्यात आले आहे. सुधारीत प्राकलनास तांत्रिक शाखेने क्र.२२२ / १७७/ दि. २२.०२.२०१५ नुसार रु. १८,२९,३००/- मान्यता प्रदान केलेली आहे. सन. २०११-१२ ची दरसुची वापरुन सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले आहे. सुधारीत प्राकलन मुळ प्राकलनापेक्षा ६.४७ % असुन १५% च्या आत आहे.

२. २. सहसचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. ग्रापापु-१००७/ प्र.क्र. २४३/पापु-०७, मंत्रालय, मुंबई दि. ४ फेब्रुवारी२००८ नुसार पाणी पुरवठा योजनांची अमलबजावणी सुरु असतांना या योजनांची किंमत मूळ किमतीपेक्षा १५% पर्यंत वाढली तर अश्या स्वतंत्र / प्रादेशीक योजनांच्या सुधारीत मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहे.

३. सदर योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात रु. १९०५ २३२७.००यामध्ये बसत आहे. आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे. कृपया यास मान्यता प्रदान करावी ही विनंती.

**ठराव क्र. ३ :- मौजे पार्डी नकटी ता. कळंब येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनास ही समिती मंजुरात प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. ९ :- मौजे धनकेश्वर ता. पुसद येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मंजुरी मीळणे बाबत.**

१. मौजे धनकेश्वर ता. पुसद जि. यवतमाळ येथील कायम स्वरुपी नळ पाणी पुरवठा योजनेची राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या लेखा शिर्षाअंतर्गत मुळ प्राकलीत किंमत रु. ४६,९१,९२०/- मंजुर करण्यात आले आहे. सदर योजनेला शासन सहभागाच्या ३०% रक्कम रु. १२,६६,८१८/-मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांचे आदेशा नुसार दि.१७.१२.२०११ ला अदा करण्यात आली आहे. सुधारीत प्राकलनास तांत्रिक शाखेने क्र.२२४ / १७७/ दि. २१.०१.२०१५ नुसार रु. ५०,२४,७१०/- मान्यता

प्रदान केलेली आहे. सन. २०१३-१४ ची दरसुची वापरुन सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले आहे. सुधारीत प्राकलन मुळ प्राकलनापेक्षा ६.६२% जास्त असुन १५ % च्या आत आहे.

२. सहसचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. ग्रापापु-१००७/ प्र.क्र. २४३/पापु-०७, मंत्रालय, मुंबई दि. ४ फेब्रुवारी२००८ नुसार पाणी पुरवठा योजनांची अमलबजावणी सुरु असतांना या योजनांची किंमत मूळ किमतीपेक्षा १५% पर्यंत वाढली तर अश्या स्वतंत्र / प्रादेशीक योजनांच्या सुधारीत मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहे.

सदर योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात रु. २०५६/- २३२७/-यामध्ये बसतआहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे. कृपया यास मान्यता प्रदान करावी ही विनंती.

**ठराव क्र. ४ :- मौजे धनकेश्वर ता. पुसद येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनास ही समिती मंजुरात प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. १० :- मौजे अकोला बाजार ता. यवतमाळ येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मंजुरी मीळणे बाबत.**

१.मौजे अकोला बाजार ता. यवतमाळ येथील कायम स्वरुपी नळ पाणी पुरवठा योजनेची राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या लेखा शिर्षाअंतर्गत मुळ प्राकलीत किंमत रु. ५८,०२,०००/- मंजुर करण्यात आले आहे. सदर योजनेला शासन सहभागाच्या ३०% रक्कम रु. २३,४९,८१०/-मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांचे आदेशा नुसार दि.३१.०३.२००९ ला अदा करण्यात आली आहे. सुधारीत प्राकलनास तांत्रिक शाखेने क्र.२२६ / १७७/ दि. २४.०२.२०१५ नुसार रु. ६४,२२,४५०/- मान्यता प्रदान केलेली आहे. सन. २०१३-१४ ची दरसुची वापरुन सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले आहे. सुधारीत प्राकलन मुळ प्राकलनापेक्षा १०.६९% जास्त असुन १५ % च्या आत आहे.

२. सहसचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. ग्रापापु-१००७/ प्र.क्र. २४३/पापु-०७, मंत्रालय, मुंबई दि. ४ फेब्रुवारी२००८ नुसार पाणी पुरवठा योजनांची अमलबजावणी सुरु असतांना या योजनांची किंमत मूळ किमतीपेक्षा १५% पर्यंत वाढली तर अश्या स्वतंत्र / प्रादेशीक योजनांच्या सुधारीत मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहे.

सदर योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात रु. १,१०४/- १,७९०/-यामध्ये बसतआहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे. कृपया यास मान्यता प्रदान करावी ही विनंती.

**ठराव क्र. ५ :- मौजे अकोला बाजार ता. यवतमाळ येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनास ही समिती मंजुरात प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

शेवटी सर्व चर्चेनंतर उपस्थिांनी सभेचे कामकाजात दिलेल्या सहकार्याबाबत मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांनी उपस्थितांचे आभार माणुन मा.सभाध्यक्ष यांच्या अनुमतीने सभेच कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सदस्य सचिव**
जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती
तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ

**बाळासाहेब मांगुळकर**
सभाध्यक्ष
जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती
जिल्हा परिषद यवतमाळ